दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप
उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उपसंपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड महाराष्ट्र | मंगळवार, 9 जून 2026 |
अंक क्र. 36 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# '...तर शिवसैनिकांनी शांत बसून चालणार नाही'; विदर्भाच्या दौऱ्यानंतर आमदार बच्चू कडूंचा थेट इशारा!

■ अमरावती वृत्तसंस्था

"प्रत्येक शिवसैनिकाच्या मनात हीच भावना असायला हवी की आपल्याच पक्षाचा मुख्यमंत्री व्हावा. आमची इच्छा आहे की देवाभाऊंचे (देवेंद्र फडणवीस) प्रमोशन व्हावे आणि एकनाथ शिंदे हेच पुन्हा राज्याचे मुख्यमंत्री व्हावे," असे स्पष्ट प्रतिपादन शिवसेना आमदार बच्चू कडू यांनी एका जाहीर कार्यक्रमात केले आहे. विदर्भातील झंझावाती दौऱ्यानंतर त्यांनी कार्यकर्त्यांना थेट मैदानात उतरण्याचे आवाहन केले आहे.

### "४ दिवसांत २० सभा"; विदर्भातून नवा एल्गार

माहितीनुसार, आमदार बच्चू कडू यांनी गेल्या १५ ते २० दिवसांत विदर्भाच्या अनेक भागात पक्षासाठी मोठे दौरे केले आहेत. "मी अवघ्या चार दिवसांत विदर्भामध्ये २० सभा घेतल्या असून जनतेशी थेट संवाद साधला आहे. हाच विदर्भ एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री करेल याची मला पूर्ण खात्री आहे," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, आगामी निवडणूक स्वबळावर लढायची की आघाडीसोबत, हे अद्याप ठरले नसले तरी शिंदेंनाच मुख्यमंत्री करायचे हा शिवसैनिकांचा एकच निर्धार असल्याचे त्यांनी सांगितले.



## शेतकरी आत्महत्या आणि कर्जमाफीवरून प्रशासनावर प्रहार

यावेळी बोलताना बच्चू कडू यांनी शेतकरी आत्महत्येच्या मुद्द्यावरून तीव्र संताप व्यक्त केला. मुख्यमंत्री असतानाही राज्यात दररोज १० ते १५ शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. कर्जमाफीच्या योजनेत शेतकऱ्यांची झालेली फसवणूक आणि त्रुटी कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतल्या जाणार नाहीत, असा इशारा देत विदर्भाच्या आणि शेतकऱ्यांच्या अपेक्षा मुख्यमंत्र्यांकडून पूर्ण झाल्याच पाहिजेत, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

व्हॉईस-ओव्हर: "नमस्कार, अतुल्या महाराष्ट्र न्यूजमध्ये आपले स्वागत. विदर्भाच्या दौऱ्यानंतर आमदार बच्चू कडू कमालीचे आक्रमक झाले आहेत! 'आता शिवसैनिकांनी शांत बसून चालणार नाही, एकनाथ शिंदेंनाच मुख्यमंत्री करा,' असा थेट इशारा त्यांनी दिलाय. अवघ्या ४ दिवसांत २० सभा गाजवल्यानंतर बच्चू कडू यांनी शेतकरी आत्महत्येच्या मुद्द्यावरून प्रशासनाला धारेवर धरले. कर्जमाफीत शेतकऱ्यांची फसवणूक खपवून घेणार नाही, असे सांगत त्यांनी देवेंद्र फडणवीसांचे प्रमोशन करून एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री पदावर पाहण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

# तुळापूर येथील फार्महाऊसवरील रेव्ह पार्टीवर पोलिसांचा छापा; आयोजकांसह ७८ जणांवर गुन्हा

## गांजा, हुक्का व मद्यसाठा जप्त; सहभागी तरुण-तरुणींची वैद्यकीय तपासणी

■ पुणे वृत्तसंस्था



पुणे ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने तुळापूर परिसरातील एका फार्महाऊसवर सुरू असलेल्या कथित रेव्ह पार्टीवर रविवारी पहाटे छापा टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत आयोजकांसह एकूण ७८ जणांविरुद्ध विविध कायद्यांअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, तुळापूर येथील एका शेतातील फार्महाऊसमध्ये मोठ्या प्रमाणात तरुण-तरुणींची पार्टी सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने पहाटे छापा टाकला. कारवाईदरम्यान पोलिसांनी गांजा, हुक्का साहित्य, मद्याच्या बाटल्या तसेच इतर आक्षेपार्ह साहित्य जप्त केले.

पोलिसांनी पार्टीचे आयोजक, डीजे ऑपरेटर, विद्युत व्यवस्था सांभाळणारे कर्मचारी तसेच इतर संबंधित व्यक्तींविरुद्ध गुन्हे नोंदवले आहेत. पार्टीत सहभागी झालेल्या काही तरुण-तरुणींचे वय २५ वर्षांखाली असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे.

या प्रकरणातील २० ते २५ जणांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, त्यांनी अमली पदार्थ किंवा मद्याचे सेवन केले होते का याबाबतचे अहवाल प्रतीक्षेत आहेत. रक्ताचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. पुणे ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणाचा पुढील तपास सुरू केला असून, पार्टीचे आयोजन, आर्थिक व्यवहार आणि अमली पदार्थांचा पुरवठा याबाबत सखोल चौकशी करण्यात येत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. तसेच अशा बेकायदेशीर पार्ट्यांविरोधात भविष्यातही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.



# सीसीटीव्हीच्या मदतीने हरवलेले सव्वादोन लाखांचे सोन्याचे दागिने मालकिणीला परत

■ अंबाजोगाई अशोक दळवे

अंबाजोगाई तालुक्यातील चनई येथील रहिवासी रेखा युवराज क्षीरसागर यांचे सुमारे ₹ लाख 25 हजार किमतीचे सोन्याचे दागिने पोलिसांच्या तत्परतेमुळे पुन्हा मिळाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, रेखा क्षीरसागर या दि. 2 जून 2026 रोजी सकाळी लोखंडी सावरगाव येथून शिवाजी चौकाकडे ऑटो रिक्षाने प्रवास करत होत्या. ऑटोमध्ये बसण्याच्या घाईत त्यांच्या हातातील दागिन्यांची पिशवी शिवाजी चौक येथील ऑटो पॉईंटजवळ खाली पडली. मात्र त्यांना याची जाणीव न झाल्याने त्या पुढे निघून गेल्या.दुसऱ्या दिवशी त्यांनी अंबाजोगाई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता, एक व्यक्ती सदरची पिशवी उचलून घेऊन जात असल्याचे आढळून आले. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत त्या व्यक्तीची ओळख खंडू अंबादास साळवे (वय 65, रा. भीमनगर, मांडवा रोड, परळी वेस अंबाजोगाई अशी पटवली.

पोलिसांनी त्यांच्या घरी जाऊन चौकशी केली असता, त्यांनी प्रामाणिकपणे पिशवी आपल्या ताब्यात असल्याचे सांगून ती पोलिसांकडे सुपूर्द केली. पिशवीमध्ये 56 मणी, दोन सोन्याचे पिळ्याचे पेंडल आणि दोन सोन्याचे झुंबर असे सुमारे दीड तोळे वजनाचे व अंदाजे ₹.25 लाख किमतीचे सोन्याचे दागिने आढळून आले.

त्यानंतर माननीय पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या हस्ते सदरचे दागिने रेखा क्षीरसागर यांना परत करण्यात आले. हरवलेले मौल्यवान दागिने अल्पावधीत शोधून काढण्यासाठी पोलीस हवालदार पांडुरंग काळे व पोलीस अंमलदार हनुमंत चादर पोलीस हवालदार नागरगोजेयांनी सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी करून संबंधित व्यक्तीचा शोध घेत मोलाची कामगिरी बजावली. या प्रकरणात प्रामाणिकपणा दाखवत दागिन्यांची पिशवी सुरक्षित ठेवून ती पोलिसांच्या स्वाधीन करणाऱ्या खंडू अंबादास साळवे यांचेही सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# सरस्वती नदी अतिक्रमणमुक्त करण्यासाठी वैद्यनाथ भक्ती मंडळाचे साखळी उपोषण सुरू

■ परळी (प्रतिनिधी)




परळी नगर पालिकेच्या वतीने सरस्वती नदीवरील अतिक्रमण न हटविता काँक्रीटीकरण करण्याचे काम सुरु असुन सरस्वती नदी अतिक्रमणमुक्त करावी,शहरात सोमवारी मांसविक्री बंद निर्णयाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी वैद्यनाथ भक्ती मंडळाच्या वतीने नगरपालिकेसमोर सोमवार दि.८ जुन पासुन साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक क्षेत्र असल्याने परळी शहरात देशभरातुन भाविक येत असतात. प्रभु वैद्यनाथाच्या धार्मिक इतिहासात शहरातुन वाहणार्या सरस्वती नदीला मोठे महत्व आहे. या नदीवर नगरपालिकेच्या वतीने दोन्ही बाजुने भिंती आणि तळाला काँक्रीटीकरण काम हाती घेण्यात आले आहे हे काम करत असताना नदीपात्रातील अतिक्रमणे काढण्यात आलेली नाहीत.नदीपात्रातील अतिक्रमणे काढुन पात्र मोकळे करावे,सोमवार हा प्रभू श्री वैद्यनाथांचा अत्यंत पवित्र दिवस मानला जात असल्याने धार्मिक भावना, परंपरा आणि भाविकांच्या श्रद्धेचा सन्मान राखण्यासाठी नगर परिषदेने दर सोमवारी मांस विक्री बंद करण्याचा निर्णय घेतला असुन या निर्णयाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी वैद्यनाथ भक्ती मंडळाच्या वतीने दीपक जोशी,कुणाल चाटे,ओमकार मिरकले,अभिजीत गुट्टे,यश शेंद्रे, वैजनाथ वडे आदींनी सोमवार दि.८ जुन पासुन नगरपालिका कार्यालयासमोर साखळी उपोषण सुरु केले आहे.या उपोषणास शहरातील व्यापारी नागरीकांनी भेट देत पाठिंबा दर्शवला आहे.

# स्वतःला महसूल विभागात अधिकारी असल्याचे भासवून जिल्हाधिकारी कार्यालयात 'पीए बनवते' म्हणत बेरोजगार तरुणाला 4 लाखांचा गंडा; महिलेचा धक्कादायक कारनामा

## महिलेविरुद्ध अंबाजोगाई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल : नोकरीचे आमिष दाखवून तरुणाची फसवणूक




■ अंबाजोगाई वृत्तसंस्था

जिल्हाधिकारी कार्यालयात नोकरी लावून देण्याच्या नावाखाली लाखोंची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार बीडच्या अंबाजोगाईतुन उघडकीस आलाय. स्वतःला महसूल विभागातील अधिकारी असल्याचे भासवणाऱ्या एका महिलेने 24 वर्षीय सुशिक्षित बेरोजगार तरुणाला जिल्हाधिकारी कार्यालयात पीए पदावर नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवत तब्बल 4 लाख रुपये उकळल्याचा प्रकार समोर आलाय. इतकेच नाही, तर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संबंध असल्याचा दावा करत अपर जिल्हाधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांना पैसे द्यावे लागतील, असे सांगून विश्वास संपादन करण्यात आला. या प्रकरणी काजल देविदास भट्ट हिच्याविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात असून अधिकचा तपास पोलिस करत आहेत.

# 14 वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग व पाठलाग करुन धमकी

■ परळी वैजनाथ, प्रतिनिधी...




माझ्यासोबत पळून नाही आलीस तर तुझ्या मामांना, आजी आजोबाला जिवंत सोडणार नाही. तुझे फोटो व्हायरल करील असे म्हणत एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग व पाठलाग करून धमकी दिल्या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात एका युवका विरुद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी कृष्णा बाबुराव शिंदे (रा. बेलांबा ता. परळी) याने एका अल्पवयीन मुलीला मैत्री करण्यासाठी वारंवार त्रास दिला. मुलीने त्यास नकार दिल्यानंतर आरोपीने तिचा पाठलाग करणे सुरू ठेवले. गल्लीमध्ये पीडित मुलगी दूध आणण्यासाठी गेलेली असताना पाठीमागे येऊन त्याने तिला पकडून तिच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. तसेच "तू माझ्याशी बोलत नाहीस" तू माझ्यासोबत पळून नाही आलीस तर तुझे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करील त्याचप्रमाणे तुझ्या मामा व आजी आजोबांना जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. ही घटना ७ जुलै २०२५ ते २२ एप्रिल २०२६ या कालावधीत बेलांबा परिसरात घडल्याचे तक्रारीत म्हटले आहे. मुलीने घडलेला प्रकार आपल्या कुटुंबीयांना सांगितल्यानंतर त्यांनी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. याप्रकरणी दि.५ रोजी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ७४, ७५, ७८, ३५१(२) तसेच लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण (पोक्सो) कायद्यातील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

## संपादकीय

# आभाळ भरून येते, पण पाऊस?

मशागतीची कामे पूर्ण करून शेतकरी पेरणीसाठी सज्ज आहे; मात्र आकाशाकडे लागलेल्या नजरा आणि पावसाची अनिश्चितता यामुळे चिंता वाढत आहे. दुसरीकडे वाढती पाणीटंचाई आणि उन्हाची तीव्रत हाल वाढवत आहे.

जून महिना सुरू होऊन आज सहावा दिवस उजाडला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार मान्सून केरळमध्ये दाखल झाला असून कर्नाटकातही त्याचे आगमन झाले आहे. तसेच दोन दिवसांपूर्वी सिंधुदुर्ग जिल्ह्यातही पावसाने हजेरी लावली आहे. आता १० जूनपर्यंत राज्याच्या इतर भागांतही मान्सून दाखल होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. असे असले तरी राज्यातील शेतकरी राजा अजूनही आकाशाकडे डोळे लावून पावसाची आतुरतेने वाट पाहत आहे. अधूनमधून ढग दाटून येत असून पाऊस येण्याचे संकेत मिळत आहेत; मात्र त्याबाबत निश्चितता नाही. परिणामी नागरिकांना कडक उन्हाचा सामना करावा लागत आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे, शेतकऱ्यांनी शेतातील मशागतीची कामे पूर्ण केली असूनही पावसाअभावी बियाण्यांची पेरणी रखडली आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत असून त्याची ही चिंता दूर करण्यासाठी पावसाचे दमदार आगमन होणे अत्यंत गरजेचे आहे. याचबरोबर अनेक भागांत पाणीटंचाईची समस्या गंभीर होत चालली आहे. गावांमध्ये शासकीय नळयोजना असली तरी एक दिवसाआड केवळ अर्धा तास पाणीपुरवठा होत आहे. काही ठिकाणी संबंधित कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे सात-आठ दिवस सार्वजनिक नळांना पाणी आलेले नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक आणि शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. मागील वर्षी याच काळात शेतकऱ्यांची लावणी सुरू झाली होती; मात्र नंतर पावसाने दडी मारल्याने अनेकांचे नुकसान झाले. यंदा मात्र त्याउलट परिस्थिती पाहायला मिळत आहे. त्यामुळे शासनाने चार-पाच वर्षांनी कर्जमाफी जाहीर करण्याऐवजी प्रत्येक आर्थिक वर्षात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण करून तातडीने नुकसानभरपाई देण्याची प्रभावी यंत्रणा विकसित करावी.

अशा प्रकारे वेळेवर मदत मिळाल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळेल आणि सरकारी तिजोरीवरही अतिरिक्त भार पडणार नाही. तसेच शेती क्षेत्रातील समस्यांवर दीर्घकालीन आणि परिणामकारक उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. कारण शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून खऱ्या अर्थाने तोच देशाचा अन्नदाता आणि राजा आहे. शासनाच्या नवीन धोरणानुसार रुपये २५ हजारांपेक्षा जास्त वेतन असलेल्या व्यक्ती, आयकर भरणारे नागरिक तसेच सरकारी नोकरीतील कर्मचाऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही. हे धोरण योग्य असले तरी नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य कारणांमुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळणे अत्यंत आवश्यक आहे. दुर्दैवाने अनेक ठिकाणी ही मदत वेळेवर पोहोचत नाही. अशा परिस्थितीत ज्या ठिकाणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत मदत वेळेत पोहोचलेली नसेल, तेथील संबंधित अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई करण्यात यावी. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळण्यास मदत होईल. याच आनुषंगाने, "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेप्रमाणेच "मुख्यमंत्री लाडके शेतकरी" ही योजना सुरू करण्यात यावी. शेतकऱ्यांसाठी आधीच अनेक योजना उपलब्ध आहेत, मग नव्या योजनेची गरज काय, असा प्रश्न अनेकांना पडू शकतो; परंतु जर विद्यमान योजना पुरेशा आणि प्रभावी असतील, तर शेतकऱ्यांवर आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ का येते? शेतकरी आत्महत्यांची कारणे शोधण्यासाठी जवळपास १५ लाख रुपये खर्च करून अहवाल तयार करण्यात आला. तरीदेखील शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी झालेले दिसून येत नाही. ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. भारत हा कृषिप्रधान देश असून देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांचे संरक्षण आणि सक्षमीकरण करणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षितता, वेळेवर मदत, योग्य मोबदला आणि संकटाच्या काळात त्वरित आधार मिळावा यासाठी "मुख्यमंत्री लाडके शेतकरी" योजनेसारखे स्वतंत्र आणि प्रभावी उपक्रम राबविण्याची आज नितांत गरज आहे. शेती हे भारतातील बहुसंख्य लोकांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन असून भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाते.

# 'हंगरफ्रीवर्ल्ड' उपक्रमाने दैनंदिन अन्न वितरण मोहिमेच्या परिवर्तनात्मक प्रभावावर प्रकाश

■ पनवेल/ वृत्तसंस्था




जागतिक भूक दिनानिमित्त मलाबार ग्रुपच्या मानवतावादी उपक्रम 'हंगरफ्रीवर्ल्ड'ने आपल्या स्ट्रीटमील डिस्ट्रीब्युशन प्रोग्रामचा प्रभाव "रिहॅबिलिटेशन इम्पॅक्ट रिपोर्ट: इम्पॅक्ट स्टोरीज – एका दैनंदिन जेवणामुळे कसे बदलते आयुष्य" या अहवालाद्वारे अधोरेखित केला. या अहवालात, थनलसंस्थेद्वारे प्रत्यक्ष स्तरावर राबविण्यात येणाऱ्या दैनंदिन अन्न वितरण मोहिमेमुळे रस्त्यावर राहणाऱ्या असुरक्षित व्यक्तींना बचाव, वैद्यकीय मदत, निवाऱ्याची सुविधा, सन्मानाची पुनर्स्थापना आणि कुटुंबीयांशी पुनर्मिलन कसे शक्य झाले, हे नोंदविण्यात आले आहे.

स्ट्रीटमील डिस्ट्रीब्युशन प्रोग्रामची सुरुवात पौष्टिक अन्नाची नियमित उपलब्धता करून भुकेच्या समस्येला उत्तर देण्यासाठी करण्यात आली होती. कालांतराने हा उपक्रम अधिक सखोल काळजी आणि सहाय्याचा दुवा बनला आहे. दैनंदिन संपर्कामुळे क्षेत्रीय कार्यकर्त्यांना लाभार्थ्यांमध्ये विश्वास निर्माण करता येतो, त्यांच्या आरोग्य आणि वर्तनातील बदल ओळखता येतात, अडचणींची जाणीव होते आणि त्यांना पुनर्वसन सेवांशी जोडता येते. या अहवालात कार्यक्रमाच्या मुख्य विश्वासाला अधिक बळ देण्यातआले आहे की, सातत्याने आणि मानवी संवेदनशीलतेने दिलेले एक जेवण मोठ्या परिवर्तनाची सुरुवात ठरू शकते.

हा कार्यक्रम सध्या भारतातील 20 राज्यांमध्ये आणि सहा GCC देश, अमेरिका, युनायटेड किंगडम आणि झांबियायांसह नऊ देशांमध्ये कार्यरत आहे. मायक्रो लर्निंग सेंटर्स आणि स्ट्रीटमील डिस्ट्रीब्युशन प्रोग्राम यादोन प्रमुख उपक्रमांद्वारे 1,43,000 लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात आले आहे. या उपक्रमाबाबत बोलताना मलाबार ग्रुपचे अध्यक्ष एम. पी. अहमद म्हणाले, "एक जेवण साधे वाटू शकते, परंतु जेव्हा ते सातत्याने आणि मानवी संवेदनशीलतेने दिले जाते, तेव्हा ते फक्त अन्न राहत नाही. हंगरफ्रीवर्ल्डच्या माध्यमातून आम्ही पाहिले आहे की नियमित संपर्क कसा विश्वास निर्माण करतो आणि तो विश्वास पुनर्वसन, आरोग्यसेवांपर्यंत पोहोच, भावनिक आधार आणि सन्मान पुनर्स्थापनेचा पाया बनतो. या कथा असुरक्षित समुदायांशी सातत्यपूर्ण संवादाचे महत्त्व अधोरेखित करतात, जिथे करुणा आणि सातत्य एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याची दिशा अर्थपूर्णपणे बदलू शकते.

# नायजेरियन दांपत्याकडून २९ लाखांचे ड्रग्ज जप्त; कोपरखैरणे येथे अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई

■ पनवेल/ वृत्तसंस्था

नवी मुंबईतील अंमली पदार्थ विरोधी पथकाने ठाणे-बेलापूर मार्गावरील कोपरखैरणे येथे एक मोठी कारवाई करत एका नायजेरियन दांपत्याला रंगेहात अटक केली आहे. या आंतरराष्ट्रीय ड्रग्ज तस्करांकडून पोलिसांनी तब्बल २९ लाख ५६ हजार रुपये किमतीचे अंमली पदार्थ हस्तगत केले असून याप्रकरणी तुर्भे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टोनी अंदाह (वय ४६) आणि नामाकुला ग्रेस (वय २५) अशी अटक करण्यात आलेल्या नायजेरियन पती-पत्नीची नावे असून, ते सध्या डोंबिवली जवळील पलावा परिसरात वास्तव्यास होते.

ठाणे-बेलापूर मार्गावर असलेल्या कोपरखैरणे येथील 'कोकिळाबेन धीरुभाई अंबानी रुग्णालय' परिसरात काही परदेशी नागरिक अंमली पदार्थांची विक्री करण्यासाठी येणार असल्याची खात्रीशीर माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. रुग्णालयाच्या आवारातील अंधार आणि आडोशाच्या ठिकाणाचा गैरफायदा घेऊन तिथे ड्रग्जची तस्करी चालणार होती आणि त्यात परदेशी व्यक्तींचा हात होता. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांच्या पथकाने गुरुवारी रात्री १२ च्या सुमारास रुग्णालय परिसराबाहेर दबा धरून सापळा रचला होता.

दरम्यान, रात्रीच्या सुमारास संशयित नायजेरियन महिला व पुरुष त्या ठिकाणी येताच पोलिसांना त्यांची हालचाल जाणवली. पोलिसांची चाहूल लागताच आणि स्वतःभोवती वेढा पडल्याचे लक्षात येताच या परदेशी दांपत्याने तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या पोलिसांनी अत्यंत सतर्कता दाखवत 'फिल्मी स्टाईल'ने त्यांचा पाठलाग केला. पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्यात जोरदार झटापट झाली. या झटापटीत आणि धावताना पडल्यामुळे परदेशी पुरुष आरोपी किरकोळ जखमी झाला. अखेर पोलिसांनी अत्यंत धाडसाने दोघांनाही जागीच ताब्यात घेतले.

दोन्ही आरोपींना ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी त्यांची कसून झडती घेतली. या झडतीदरम्यान त्यांच्याकडे २५.४ ग्रॅम कोकेन आणि ५६.२ ग्रॅम एमडी (मेफेड्रॉन) असा एकूण २९ लाख ५६ हजार रुपये किमतीचा अंमली पदार्थांचा साठा मिळून आला. पोलिसांनी हा सर्व मुद्देमाल जप्त केला असून, तुर्भे पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा नोंदवून नायजेरियन दांपत्याला अटक केली आहे. हे दांपत्य एवढ्या मोठ्या प्रमाणावर ड्रग्ज कुठून आणत होते आणि नवी मुंबईत ते कोणाला पुरवणार होते, याचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## 'पर्यावरणाची सुरुवात स्वतःपासून करा' ; नवी मुंबईत पहिल्या 'प्लास्टिक बॉटल क्रशर मशीन'चे

■ पनवेल/ वृत्तसंस्था




कचऱ्याचे निर्मितीच्या ठिकाणीच वर्गीकरण करणे आणि प्लास्टिक पिशव्यांऐवजी कापडी पिशव्यांचा वापर वाढवणे याला सर्वांनी प्राधान्य दिले पाहिजे. कोणत्याही चांगल्या गोष्टीचा प्रारंभ किती आत्मियतेने केला यावर त्याचे यश अवलंबून असते, त्यामुळे पर्यावरणाची सुरुवात आपण स्वतःपासूनच करायला हवी, असे प्रतिपादन नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले. महानगरपालिकेचा प्रत्येक कर्मचारी हा शहराचा ब्रँड ॲम्बेसेडर आणि 'प्लास्टिक मार्शल' आहे, असे सांगत त्यांनी शहर स्वच्छता व प्लास्टिक प्रतिबंधासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महापालिका मुख्यालयाच्या तळमजल्यावर दर्शनी भागात बसविण्यात आलेल्या पहिल्या 'प्लास्टिक बॉटल क्रशर मशीन'चा शुभारंभ आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाला.

**अशी असेल 'गिफ्ट पॉईंट' योजना :** 'अटोस'च्या सीएसआर निधीतून, 'रोटरी क्लब' व 'बायोक्रक्स' या संस्थांच्या सहयोगाने ही मशीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मशीनमध्ये प्लास्टिक बॉटल टाकून की-पॅडवर आपला मोबाईल क्रमांक नोंदवल्यास, पर्यावरणपूरक उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल मोबाईलवर दोन पॉईंट्स मिळतील. हे पॉईंट्स संकलित झाल्यानंतर 'स्मार्ट बझार'द्वारे उपयोगी वस्तू मोफत मिळणार आहेत. अशा १२ मशिन्स महापालिका रुग्णालये व मार्केटसारख्या वर्दळीच्या ठिकाणी बसविण्यात येणार आहेत.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पनवेल महानगर पालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी वृक्षारोपण

■ पनवेल/ वृत्तसंस्था




जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नावडे, खारघर, कळंबोली आणि कामोठे येथे वृक्षारोपण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत नागरिक, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि महापालिका अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहभागातून हे उपक्रम उत्साहात राबविण्यात आले.

**खारघर प्रभाग :** खारघर सेक्टर-२१ येथील ग्रामविकास भवन शेजारील भूखंड क्रमांक ३ येथे उद्यान विभागामार्फत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी आवळा, करंज, ताम्हण, कांचन, पेरू, काजू आणि चिंच यांसह सुमारे १०० वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमास महापालिका सदस्य प्रवीण पाटील, अनिता पाटील, मधु पाटील, परेशा ब्रिजेश पटेल, शत्रुघ्न काकडे, लीना गरड आणि अजित अडसुळे यांची उपस्थित होते. तसेच प्रभाग अधीक्षक जितेंद्र मढवी, उद्यान पर्यवेक्षक नितीन राठोड, स्वच्छता निरीक्षक अतुल मोहकर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमात रोटरी क्लब ऑफ नवी मुंबई सनराइज, आर संकल्प फाउंडेशन, के.एल.ई. महाविद्यालय कळंबोलीचे प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) युनिटच्या विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. परिसरातील ज्येष्ठ नागरिक आणि पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**नावडे उपविभाग :** नावडे उपविभागातील पिसार्वे तलाव परिसरात आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमास विरोधी पक्ष नेते अरविंद म्हात्रे, महापालिका सदस्य हरेश केणी, जनार्दन पाटील, विजयश्री पाटील, योगिता फडके, लीना म्हात्रे आणि नंदकुमार म्हात्रे उपस्थित होते.

**कळंबोली प्रभाग समिती 'ब :** कळंबोली प्रभाग समिती 'ब' अंतर्गत रोडपाली, सेक्टर-१७ येथील भूखंड क्रमांक ४ येथे आयोजित कार्यक्रमात कांचन, ताम्हण, करंज, पेरू आदी १०० देशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम तसेच महापालिका सदस्य अमर पाटील, रवींद्र भगत, सरस्वती काथारा, बायजा बारगजे आणि दमयंती भोईर, रविनाथ पाटील उपस्थित होते. स्थानिक रहिवासी, ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमींनीही सहभाग घेतला.

**कामोठे प्रभाग समिती क :** कामोठे प्रभाग समिती 'क' अंतर्गत सेक्टर-८ येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागील मैदानात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या ठिकाणी कांचन, ताम्हण आणि करंज यांसह विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमास महापालिका सदस्य अरुणकुमार भगत, विकास घरत, सामाजिक कार्यकर्ते सुरेश खरात तसेच स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमी उपस्थित होते. विविध ठिकाणी झालेल्या या वृक्षारोपण उपक्रमांद्वारे पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्रात वाढ आणि भावी पिढ्यांसाठी स्वच्छ व निरोगी पर्यावरण निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. वृक्ष लागवडीबरोबरच त्यांच्या संगोपनाची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने स्वीकारावी, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी यावेळी केले.




# महापौर नितीन पाटील यांनी प्रभाग १४ मधील पावसाळ्यापूर्वीच्या कामांची केली पाहणी

■ पनवेल/ वृत्तसंस्था

पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी प्रभाग क्रमांक १४ मधील विविध ठिकाणी नालेसफाई व पावसाळ्यापूर्वी सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी परिसरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील सखल भागांमध्ये पाणी साचू नये, नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये तसेच नाल्यांमधील गाळ व अडथळे तातडीने दूर करण्यात यावेत, यासाठी महापौरांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले. विविध ठिकाणी सुरू असलेल्या नालेसफाईच्या कामांचा आढावा घेत कामांची गुणवत्ता आणि गती यावरही त्यांनी भर दिला.

प्रभागातील विकासकामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावीत यासाठी भाजपाचे चारही उमेदवार सातत्याने पाठपुरावा करत येत असून नागरिकांच्या सुरक्षिततेला आणि सुविधांना सर्वोच्च प्राधान्य दिले जात असल्याचे महापौर नितीन पाटील यांनी यावेळी सांगितले. या पाहणी दौऱ्यावेळी पनवेल भाजपा ओबीसी सेल अध्यक्ष सतिश पाटील, माजी नगरसेवक गणपत म्हात्रे, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे, भाजपा पनवेल मंडल सरचिटणीस रुपेश नागवेकर, उपाध्यक्ष अतुल भगत, प्रभाग अध्यक्ष गणेश म्हात्रे, भाजपा नेते शैलेश म्हात्रे, रोहीत आठवणे, रुपेश आंबोलकर, अभिजित जाधव, सचिन गमरे, युवा मोर्चा अध्यक्ष कुणाल पाटील व स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, महानगरपालिका अधिकारी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपा उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी सांगितले कि, प्रभाग १४ मधील नागरिकांना पावसाळ्यात कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी महापौर नितीनभाई पाटील यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने पाठपुरावा केला जात आहे.

# टपरीच्या वादातून तुर्भे पोलीस ठाण्याबाहेर दोन गटांत राडा; उद्धवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह दोन्ही बाजूंच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल

■ पनवेल/ वृत्तसंस्था

तुर्भे एमआयडीसी परिसरातील एका अनधिकृत टपरी आणि कथित अवैध धंद्यांच्या तक्रारीवरून गुरुवारी तुर्भे पोलीस ठाण्याबाहेरच दोन गटांत जोरदार राडा झाला. दोन्ही गटांतील कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या या हाणामारीनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी तुर्भे पोलिसांनी उद्धवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह टपरीचालक महिलेच्या गटाविरुद्ध परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, तुर्भे येथील इंदिरानगर परिसरातील एका नाल्यावर असलेल्या अनधिकृत टपरीमुळे पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण होत असून, तिथे अवैध धंदे सुरू असल्याची तक्रार उद्धवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी महानगरपालिका आणि पोलिसांकडे केली होती. दोन महिन्यांपूर्वी या टपरीवर झालेल्या कारवाईदरम्यान तक्रारदाराचे नाव उघड झाल्याने, संबंधित तक्रारदारावर जीवघेणा हल्ला झाल्याचा आरोपही करण्यात आला होता.

दरम्यान, संबंधित टपरी पुन्हा उभारून तिथे ड्रग्जविक्री सुरू असल्याचा दावा उद्धवसेनेने केला आहे. या संदर्भात चर्चा करण्यासाठी ऐरोली शहरप्रमुख महेश कोटीवाले यांच्यासह त्यांचे सहकारी गुरुवारी तुर्भे पोलीस ठाण्यात गेले होते. यावेळी टपरीविरोधातील तक्रारीमुळेच आपल्यावर हल्ला घडवून आणल्याचा आरोप कोटीवाले यांनी केला असून, त्यांनी पूजा बनसोडे, सीमा माने, सरिता सरोदे ऊर्फ सोनी आणि प्रमिला गुप्ता यांच्याविरोधात तक्रार दाखल केली आहे. दुसरीकडे, टपरीचालक महिलांच्या गटाकडून सरिता सरोदे व सीमा माने यांनी महेश कोटीवाले आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर गंभीर आरोप केले आहेत. कोटीवाले व त्यांच्या सहकाऱ्यांनी पैशांची (खंडणीची) मागणी केल्याचा आरोप करत, मध्यस्थीच्या चर्चेदरम्यान त्यांनी शिवीगाळ व मारहाण केल्याची तक्रार महिलांनी दिली आहे. तसेच आपला कोणत्याही अवैध व्यवसायाशी संबंध नसल्याचा दावाही त्यांनी केला. या वादाच्या पार्श्वभूमीवर, उद्धवसेनेचे आकाश शिंगटे यांनी मागील महिन्यात तुर्भे पोलिसांकडे या परिसरातील अवैध धंद्यांशी संबंधित व्यक्तींच्या गुन्हेगारी नोंदींची माहिती मागवली होती. त्यानुसार सरिता सरोदे यांच्यावर ड्रग्जविक्रीचे चार, सीमा माने यांच्यावर दारूविक्रीचे दहा, गणेश माने यांच्यावर दोन, रमजान शेख यांच्यावर एक आणि दादा माने यांच्यावर तीन गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आल्याचा दावा उद्धवसेनेकडून करण्यात आला आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# जिल्ह्यातून शिक्षकांनी मोठ्या संख्येने राळेगणसिद्धी येथे जमावे : विनायकराव शिंदे





## तासगावात शिक्षक संघ जिल्हा कार्यकारिणीची सभा

**भाटवडे/सांगली प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने ऐतिहासिक आंदोलनभूमी राळेगणसिद्धी येथे येत्या ११ जून रोजी भव्य महामंडळ सभा व शिक्षण हक्क परिषद आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे नेते संभाजीराव थोरात आणि शिक्षक संघाचे राज्याचे अध्यक्ष बाळासाहेब मारणे यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या महामंडळात सांगली जिल्ह्यातील राज्य, जिल्हा पार्लमेंटरी व तालुका पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सांगली जिल्हा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष विनायक शिंदे यांनी केले.

तासगाव येथे सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या जिल्हा कार्यकारणी बैठकीत ते बोलत होते.

यावेळी ते म्हणाले या सभेस जेष्ठ समाजसेवक, पद्मभूषण अण्णा हजारे आणि पद्मश्री पोपटराव पवार हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या मार्गदर्शनातून शिक्षक चळवळीला नवी दिशा मिळणार असल्याची अपेक्षा सर्व थरातून व्यक्त होत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात राळेगणसिद्धी ही भूमी अनेक आंदोलनाची साक्षीदार राहिली असून सामान्य माणसांच्या हक्कासाठी अण्णा हजारे यांनी याच ठिकाणाहून प्रभावी लढे उभारले आहेत.

सध्या शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांमुळे शिक्षक व विद्यार्थी वर्गात अस्वस्थता निर्माण झाली आहे. टीईटी, पदोन्नती, संच मान्यता, बीएलओ कामे, वाढते ऑनलाईन कामकाज, गैरसोयीच्या बदल्या, रिक्त पदांचा प्रश्न, संच मान्यता अशा अनेक समस्यांनी सरकारी शाळांचे भवितव्य धोक्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी ही परिषद महत्वपूर्ण ठरणार आहे. लोकशाही मार्गाने वारंवार निवेदने, अर्ज देऊन व आंदोलने करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने अण्णा हजारे व पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार शिक्षक संघाच्या वतीने त्यांनी व्यक्त केला आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयातील लढ्याबाबतही या बैठकीत चर्चा करण्यात आली.

राळेगणसिद्धी येथील स्वर्ग लॉन्स येथे सकाळी १० वाजता होणाऱ्या या सभेला जिल्ह्यातील सर्व शिक्षक, संघटनेचे पदाधिकारी, महिला आघाडी, सेवानिवृत्त शिक्षक संघटना व संबंधित घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

प्रास्ताविक नंदकुमार खराडे यांनी केले. आभार अरुण पाटील यांनी मानले.

यावेळी संतोष जगताप, शरद चव्हाण, गांधी चौगुले, श्रीकांत पवार, रणजीत नाटेकर, सुधाकर पाटील, दीपक रोकडे, राजाराम कदम, वसंत शिंगारे, असिफ मुजावर, अजिनाथ बुधावले, विकास वायदंडे, संजय सावंत, सचिन पाटील, तानाजी कोडग, जालिंदर जाधव, संजय यमगर, बसवराज येलगार, दत्तात्रय वाघमारे, विशाल मोरे, संदीप खंडागळे, सुखदेव पाटील, राजाराम चौगुले, जयंत नाईक, जकी कोरे, विठ्ठल धेंडे, चंद्रकांत कांबळे, श्रीधर सूर्यवंशी, किरण सोहनी, महेश गोंजारी अनिल कदम, धनाजी साळुंखे उपस्थित होते.

# तुळापूर रेव्ह पार्टी प्रकरणात मोठी कारवाई

**तुळापूर** | तुळापूर येथील कथित रेव्ह पार्टी प्रकरणात लोणीकंद पोलिसांनी मोठी कारवाई करत संबंधित फार्महाऊस सील केले आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मुख्य प्रवेशद्वार व इमारतीला अधिकृत सील लावले असून परिसर ताब्यात घेतला आहे.

शनिवारी मध्यरात्री पुणे ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने तुळापूर रोडवरील एका फार्महाऊसवर छापा टाकून सुरू असलेली कथित रेव्ह पार्टी उधळून लावली होती. या कारवाईदरम्यान आयोजक, व्यवस्थापक, डीजे ऑपरेटर, बारटेंडर तसेच पार्टीत सहभागी झालेल्या अनेक व्यक्तींविरोधात विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तपासाच्या अनुषंगाने रविवारी लोणीकंद पोलिसांनी घटनास्थळाची सखोल पाहणी केली. महत्त्वाचे पुरावे सुरक्षित राहावेत आणि कोणत्याही प्रकारची छेडछाड होऊ नये यासाठी संबंधित

## फार्महाऊस सील



फार्महाऊस सील करण्यात आल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली.

प्राथमिक तपासात परवानगीच्या वेळेचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात डीजे सुरू असल्याचे समोर आले आहे. याशिवाय मद्यपान, हुक्का सेवा आणि अमली पदार्थांच्या संभाव्य वापराबाबतही तपास सुरू आहे. जप्त करण्यात आलेल्या साहित्याची फॉरेन्सिक तपासणी तसेच संबंधित व्यक्तींचे वैद्यकीय अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाने पावन झालेल्या तुळापूरसारख्या ऐतिहासिक स्थळी अशा प्रकारची घटना उघडकीस आल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, फार्महाऊस सील करण्यात आल्याने या प्रकरणाच्या तपासाला अधिक गती मिळण्याची शक्यता असून गुन्हे शाखा व लोणीकंद पोलीस संयुक्तपणे आर्थिक व्यवहार, परवानगी प्रक्रिया आणि इतर संबंधित बाबींची कसून चौकशी करत आहेत.

# व्यंकटराव निर्मळ पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन

**सिरसाळा :** हिवरा गोवर्धन येथील प्रतिष्ठित नागरिक तथा प्रगतिशील शेतकरी कै. व्यंकटराव अच्युतराव निर्मळ पाटील यांचे सोमवार दिनांक 8 जून रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. काही दिवसांपूर्वीच छत्रपती संभाजीनगर येथील येथील एका खाजगी रुग्णालयात त्यांच्या मेंदूवर एक छोटीशी शस्त्रक्रिया करण्यात आली होती.आपल्या मनमोकळ्या स्वभावामुळे आणि सर्वांना अडीअडचणीत सहकार्य करण्याच्या वृत्तीमुळे व्यकटराव निर्मळ हे हिवरा गोवर्धन आणि पंचक्रोशीत प्रसिद्ध होते. सोमवारी सायंकाळी 5 वाजता व्यंकटराव निर्मळ पाटील यांच्या पार्थिवावर हिवरा गोवर्धन येथील स्मशानभूमीत दुःखद वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात



आले. याप्रसंगी हिवरा गोवर्धन व परिसरातील सर्व स्तरातील प्रतिष्ठित आणि नामांकित मंडळी उपस्थित होती. माजी जिल्हा परिषद सदस्य वृक्षराज निर्मळ पाटील यांचे ते वडील होत तर भाजपचे परळी तालुका मंडळ अध्यक्ष वसंतराव निर्मळ पाटील यांचे ते चुलते होत.

# धरती आबा बिरसा मुंडांचा अमर वारसा : डॉ. राजेंद्र बगाटे

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा विविध संघर्ष, त्याग, बलिदान आणि जनआंदोलनांनी समृद्ध झालेला इतिहास आहे. या इतिहासात अनेक महान नेत्यांनी आपल्या कार्याने आणि विचारांनी अमिट ठसा उमटविला आहे. तथापि, दीर्घकाळ भारतीय इतिहासलेखनाच्या मुख्य प्रवाहात काही अशा व्यक्तिमत्त्वांकडे तुलनेने कमी लक्ष दिले गेले, ज्यांनी आपल्या समाजासाठी आणि देशासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले. अशा महान व्यक्तिमत्त्वांमध्ये बिरसा मुंडा यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि अस्तित्वासाठी संघर्ष करणारे बिरसा मुंडा हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर ते अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे, सामाजिक परिवर्तनाचे आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षेचे प्रतीक होते. आदिवासी समाज त्यांना प्रेमाने आणि आदराने "धरती आबा" म्हणजेच "धरतीचे पिता" म्हणून संबोधतो. ९ जून हा त्यांचा स्मृतिदिन असून हा दिवस केवळ त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा नसून आदिवासी समाजाच्या अस्मितेचा, संघर्षाचा आणि स्वाभिमानाचा गौरव करण्याचा दिवस आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारत ब्रिटिश सत्तेच्या जोखडाखाली होता. इंग्रजांनी आपल्या प्रशासनिक आणि आर्थिक धोरणांच्या माध्यमातून भारतीय समाजातील विविध घटकांवर प्रभाव टाकला. या धोरणांचा सर्वाधिक विपरीत परिणाम आदिवासी समाजावर झाला. जंगल, जमीन आणि जल यांवर आधारित जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजाचे अस्तित्वच धोक्यात आले. ब्रिटिशांनी वनकायदे लागू करून जंगलांवरील आदिवासींचे पारंपरिक हक्क नाकारले. महसूल व्यवस्थेमुळे त्यांच्या जमिनींवर कर लादले गेले. सावकार, व्यापारी आणि जमीनदार यांच्या संगनमताने आदिवासींच्या जमिनी बळकावल्या जाऊ लागल्या. परिणामी हजारो आदिवासी कुटुंबे आपल्या पारंपरिक उपजीविकेपासून वंचित झाली. त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक



जीवनावर गंभीर परिणाम झाला. अशा कठीण परिस्थितीत आदिवासी समाजामध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारे नेतृत्व बिरसा मुंडा यांनी केले.

१५ नोव्हेंबर १८७५ रोजी आजच्या झारखंड राज्यातील उलिहातू या गावात बिरसा मुंडा यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सुगना मुंडा आणि आई करमी हातू हे सामान्य आदिवासी कुटुंबातील कष्टकरी होते. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे त्यांच्या कुटुंबाला वारंवार स्थलांतर करावे लागत असे. अशा परिस्थितीत वाढलेल्या बिरसा यांना लहानपणापासूनच श्रम, संघर्ष आणि वास्तव जीवनाचा परिचय झाला. बालपणीच त्यांच्यामध्ये नेतृत्वाचे गुण आणि तीक्ष्ण निरीक्षणशक्ती दिसून येत होती. निसर्गाशी असलेले त्यांचे नाते अतिशय घट्ट होते. जंगल, डोंगर, नद्या आणि ग्रामीण जीवन यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल प्रभाव पडला.

बिरसा यांनी प्राथमिक शिक्षण स्थानिक शाळेत घेतले. पुढे त्यांना जर्मन मिशन शाळेत शिक्षण घेण्याची संधी मिळाली. शिक्षणामुळे त्यांच्या विचारविश्वाला नवी दिशा मिळाली. त्यांनी समाजातील विषमता, अन्याय आणि



शोषण यांचे बारकाईने निरीक्षण केले. मिशनरी शिक्षणाच्या काळात त्यांना आधुनिक शिक्षणाचा परिचय झाला, परंतु त्याचवेळी त्यांनी आपल्या समाजाच्या सांस्कृतिक परंपरांचे महत्त्वही जाणले. शिक्षणामुळे त्यांच्यात चिकित्सक दृष्टिकोन विकसित झाला. त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, अशिक्षण आणि व्यसनाधीनतेची कारणे समजून घेण्याचा प्रयत्न केला. तसेच ब्रिटिश सत्तेच्या धोरणांमुळे आदिवासी समाजावर होणाऱ्या परिणामांचाही त्यांनी अभ्यास केला.

त्या काळात आदिवासी समाज अनेक समस्यांनी ग्रस्त होता. आर्थिक शोषण, सामाजिक उपेक्षा, अशिक्षण आणि अंधश्रद्धा यांमुळे समाजाची प्रगती खुंटली होती. बिरसा यांनी ओळखले की समाजाच्या उन्नतीसाठी सर्वप्रथम सामाजिक जागृती आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी समाजसुधारणेचे कार्य हाती घेतले. त्यांनी लोकांना मद्यपान, जादूटोणा, अंधश्रद्धा आणि इतर सामाजिक कुरीतींपासून दूर राहण्याचे आवाहन केले. त्यांनी स्वच्छता, शिक्षण, शिस्त, नैतिकता आणि परिश्रम यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे आणि प्रेरणादायी विचारांमुळे हजारो लोक त्यांच्या सभांमध्ये सहभागी होऊ लागले.

बिरसा मुंडा हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते एक धार्मिक जागृतीचे प्रणेतेही होते. त्यांनी आदिवासी समाजाला त्यांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक मुळांशी जोडण्याचा प्रयत्न केला. त्या काळात विविध धर्मप्रचारक संस्थांचा आदिवासी भागांमध्ये प्रभाव वाढत होता. अनेक आदिवासी आपली पारंपरिक ओळख गमावण्याच्या स्थितीत होते. बिरसा यांनी आदिवासी संस्कृती, श्रद्धा आणि जीवनमूल्यांचे संरक्षण करण्यासाठी चळवळ उभारली. त्यांनी एकेश्वरवादाचा संदेश दिला आणि नैतिक जीवन जगण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या अनुयायांमध्ये एक नवीन धार्मिक-सामाजिक चेतना निर्माण झाली. पुढे ही चळवळ "बिरसाईत" म्हणून प्रसिद्ध झाली.

बिरसा यांच्या विचारांचा प्रभाव झपाट्याने वाढू लागला. लोक त्यांना केवळ समाजसुधारक म्हणून नव्हे, तर एक आध्यात्मिक नेता म्हणूनही पाहू लागले. त्यांच्या सभांमध्ये हजारो लोक सहभागी होत. त्यांनी लोकांमध्ये आत्मसन्मान आणि आत्मविश्वास निर्माण केला. त्यांनी सांगितले की कोणताही समाज आपल्या हक्कांसाठी जागरूक झाला तर त्याला कोणीही गुलाम बनवू शकत नाही. त्यांच्या संदेशामुळे आदिवासी समाजात एक नवीन जागृती निर्माण झाली.

दरम्यान, ब्रिटिश सत्तेच्या धोरणांमुळे आदिवासींच्या समस्या अधिकच वाढत होत्या. जंगलांवरील निर्बंधांमुळे त्यांची उपजीविका धोक्यात आली होती. जमीनदार आणि सावकार यांच्या शोषणामुळे अनेक कुटुंबे कर्जबाजारी झाली होती. आदिवासींना त्यांच्या स्वतःच्या जमिनीवर मजूर म्हणून काम करावे लागत होते. या परिस्थितीने बिरसा यांच्या मनात तीव्र असंतोष निर्माण झाला. त्यांनी ओळखले की सामाजिक सुधारणांसोबतच राजकीय संघर्षही आवश्यक आहे. म्हणून त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून अन्यायाविरुद्ध लढण्याचे आवाहन केले.

याच काळात बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली "उलगुलान" या ऐतिहासिक चळवळीची सुरुवात झाली. "उलगुलान" म्हणजे महान क्रांती किंवा महान उठाव. ही चळवळ आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि स्वातंत्र्यासाठी उभारलेली व्यापक लोकचळवळ होती. बिरसा यांनी "अबुआ दिशुम, अबुआ राज" म्हणजे "आपला देश, आपले राज्य" हा संदेश दिला. या घोषणेमध्ये स्वराज्याची बीजे दडलेली होती. त्यांनी आदिवासींना अन्यायकारक कर भरण्यास नकार देण्याचे आणि आपल्या जमिनींचे रक्षण करण्याचे आवाहन केले.

१८९५ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांच्या वाढत्या प्रभावामुळे त्यांना अटक केली. त्यांना कारावासाची शिक्षा झाली. परंतु तुरुंगवासामुळे त्यांच्या लोकप्रियतेत घट झाली नाही. उलटपक्षी, त्यांचे विचार अधिक व्यापक प्रमाणात लोकांपर्यंत पोहोचले. तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी नव्या जोमाने चळवळीला सुरुवात केली. त्यांनी आदिवासी समाजाला अधिक संघटित केले आणि ब्रिटिशांविरुद्ध संघर्षाची तयारी केली.

१८९९ आणि १९०० या काळात उलगुलान चळवळ आपल्या शिखरावर पोहोचली. हजारो आदिवासी बिरसा यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सत्तेविरुद्ध उभे राहिले. अनेक ठिकाणी सरकारी यंत्रणांविरुद्ध प्रतिकार करण्यात आला. शोषण करणाऱ्या जमीनदारांविरुद्ध संघर्ष उभारण्यात आला. या उठावामुळे ब्रिटिश प्रशासन हादरून गेले. आदिवासी समाजाची एकजूट आणि त्यांची संघर्षशक्ती पाहून ब्रिटिश सरकार चिंतेत पडले.

उलगुलान चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे ती केवळ राजकीय बंड नव्हती. ती सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक मुक्तीची चळवळ होती. आदिवासी समाजाला त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, त्यांची जमीन वाचविणे आणि त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देणे हे तिचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात या चळवळीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

ब्रिटिश सरकारने या उठावाचे दमन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लष्करी कारवाई केली. अनेक आदिवासींना अटक करण्यात आली. अनेकजण संघर्षात शहीद झाले. अखेर ३ फेब्रुवारी १९०० रोजी बिरसा मुंडा यांना अटक करण्यात आली. त्यांना रांची कारागृहात ठेवण्यात आले. कारागृहात असताना त्यांची प्रकृती खालावत गेली. ९ जून १९०० रोजी अवघ्या पंचविसाव्या वर्षी त्यांचे निधन झाले.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड, मंगळवार 9 जून 2026



# गुंगीचे औषध असलेले मंचुरियन खाऊ घातले दोघांनी अत्याचार केल्याची धक्कादायक घटना

## तीन लाखांसह साडेनऊ तोळे सोने उकळले, दोन तरुण जेरबंद

अंबाजोगाई | प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील एका महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या २० वर्षीय तरुणीला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर दोघांनी अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आरोपींनी अत्याचाराचे फोटो आणि व्हिडिओ कुटुंबाला दाखवण्याची धमकी देत पीडितेकडून तीन लाख रुपयांची रोकड आणि साडेनऊ तोळे सोने लुटले. याप्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली असून शहरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पीडित तरुणी अंबाजोगाई येथे महाविद्यालयीन शिक्षणासाठी राहत असताना तिची ओळख महेश करपे (रा. धारूर) आणि पवन कराड (रा. पांगरी, ता. परळी) या दोन तरुणांशी झाली. हे दोघे तिचा सतत पाठलाग करत असत. एके दिवशी महेश याने तरुणीला जबरदस्तीने मंचुरियन खाऊ घातले, ज्यामध्ये गुंगीचे औषध मिसळले होते. तरुणी बेशुद्ध झाल्यानंतर आरोपींनी तिच्यावर अत्याचार केला.

त्यानंतर पवन कराड यानेही तिला गुंगीचे औषध देऊन पुणे येथील एका लॉजवर नेऊन तिच्यावर अत्याचार केला. दोन्ही आरोपींनी या कृत्याचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व नातेवाईकांना दाखवण्याची धमकी देत पीडितेला ब्लॅकमेल करणे सुरू केले. या भीतीपोटी आरोपींनी पीडितेकडून वेळोवेळी तीन लाख रुपये आणि साडेनऊ तोळे सोन्याचे दागिने उकळले. हा छळ असह्य झाल्याने शेवटी पीडितेने पोलीस ठाण्यात धाव घेतली. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी महेश करपे आणि पवन कराड या दोघांना अटक केली असून पुढील तपास सुरु आहे.







# तौहीद खान कुटुंबीयांची धनंजय मुंडेंनी घेतली भेट, तिन्ही अपत्यांच्या शिक्षणाची स्वीकारली जबाबदारी

## खान कुटुंबीयांना न्याय मिळेल - धनंजय मुंडे




परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)

काही दिवसांपूर्वीच परळीजवळ झालेल्या एका दुर्दैवी हत्याकांडात मृत्युमुखी पडलेल्या मयत तौहीद खान याच्या कुटुंबाची रविवारी सायंकाळी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी भेट घेतली. यावेळी मयत तौहीद यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करत मुंडेंनी तोहीदला श्रद्धांजली वाहिली. तसेच तौहीद याच्या दोन मुली व एक मुलगा अशा तीनही अपत्याच्या शिक्षणाची जबाबदारी धनंजय मुंडे यांनी स्वीकारली असल्याचे कुटुंबियांना स्पष्ट केले.

दरम्यान मयत तौहीद खान याच्या हत्या प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, यादृष्टीने जलद गतीने व सर्व बाजूने तपास करून लवकरात लवकर चार्जशीट दाखल करण्यात यावी, याबाबत पोलिस प्रशासनास श्री. मुंडे यांनी सूचना केल्या.

मयत तौहीद खान हा घरातील एक कर्ता तरुण गमावल्याने कुटुंबाची अडचण लक्षात घेत धनंजय मुंडे यांनी खान कुटुंबीयांना नाथ प्रतिष्ठान मार्फत एक लाख रुपयांची तात्पुरती आर्थिक मदत रोख स्वरूपात केली आहे.

खान कुटुंबीयांना न्याय मिळेल यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले. तसेच अनेक पिढ्यांपासून परळीत जो भाईचारा जोपासला जात आहे, तो पुढेही अबाधित रहावा, आहे आवाहनही धनंजय मुंडे यांनी केले.

याप्रसंगी श्री. मुफ्ती साहेब यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अय्युब भाई पठाण, बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्ष राजा खाँ पठाण, जाबेर खाँ पठाण, शकील भाई कुरेशी, अजिज कच्छी, श्रीकृष्ण कराड, श्रीकांत फड, राजेंद्र सोनी, जावेद कुरेशी यांच्या सह स्थानिक पदाधिकारी - नागरिक उपस्थित होते.

# कानडी बुद्रुक चा १६ वर्ष्याचा उदयराज काळाच्या पडद्याआड

कडा | प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कानडी बुद्रुक येथील सोळा वर्षाचा चिमूरडा उदयराज पोहायला गेला असताना दिनांक ४ जून रोजी हौदात बुडून मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या वेळी उदयचे वय वर्ष १६असे होते उदयच्या पश्चात, आई, वडील, बहीण, आजी, आजोबा, असा मोठा परिवार आहे, उद्याच्या जाण्याने, कुटुंबावर नाही तर पूर्ण गावावरती, दुःखाचा डोंगर कोसळला आहे,

नियतीचा खेळ किती क्रूर असतो, याची प्रचिती कानडी बुद्रुक गावाला आली आहे. आयुष्याची सुंदर स्वप्ने डोळ्यांत साठवून, कुटुंबाच्या आशा-आकांक्षांचे केंद्र असलेला चिरंजीव उदयराज भारत खिळे याच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

उदयराजच्या अकाली जाण्याने आई-वडिलांच्या काळजाचा तुकडाच निघून गेला आहे. घरात सतत घुमणारा त्याचा निरागस आवाज कायमचा शांत झाला असून, त्याच्या आठवणींनी खिळे परिवारासह नातेवाईक आणि मित्रपरिवार हळहळ व्यक्त करत आहेत. "अजून आयुष्याची सुरुवातही झाली नव्हती, पण काळाने त्याला आपल्यातून हिरावून नेले," अशा भावना गावकऱ्यांकडून व्यक्त होत आहेत. तसेच ११ जून ला कानडी बुद्रुक येथे दशक्रिया विधी होणार आहे.



# अनिषा ग्लोबल स्कूलमध्ये जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा

**आष्टी :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अनिषा ग्लोबल स्कूल आणि वनपरिक्षेत्र कार्यालय, आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या आवारात वृक्षारोपण करून करण्यात आली. यावेळी शाळेचे प्राचार्य अविनाश राऊत, हरजोत कौर जोगी तसेच विद्यार्थ्यांच्या हस्ते विविध प्रकारची वृक्षलागवड करण्यात आली. वृक्षारोपणानंतर पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यासाठी भव्य जनजागृती रॅली काढण्यात आली. “झाडे लावा, झाडे जगवा” या घोषवाक्यांनी परिसर दणाणून गेला. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देणारे फलक हातात घेऊन नागरिकांना वृक्षसंवर्धनाचे आवाहन केले.

यानंतर विद्यार्थ्यांनी वनपरिक्षेत्र कार्यालय, शेरी बुद्रुक येथे भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या वृक्षांची माहिती देण्यात आली. तसेच वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाची प्रतिज्ञा घेतली.



यावेळी वनक्षेत्रपाल अधिकारी आष्टी श्री. ए. डी. मुंढे, वनपाल श्री. डी. डी. जायभाये, वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. एस. पी. आरशेवाद, वनपाल श्री. एल. व्ही. तागड तसेच सौ. सविता निकम यांनी विद्यार्थ्यांना वनसंपदेचे महत्त्व, जैवविविधतेचे संरक्षण आणि वृक्षसंवर्धनाची आवश्यकता याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे प्रत्यक्ष धडे मिळाले असून, निसर्गाविषयी प्रेम व जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

याप्रसंगी शाळेचे प्राचार्य अविनाश राऊत, हरजोत कौर जोगी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणारा हा उपक्रम सर्वांच्या कौतुकास पात्र ठरला.

# युवराज भास्करराव मुंडे यांना पीएचडी प्रदान



परळी (प्रतिनिधी)

युवराज भास्कर मुंडे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएचडी पदवी प्रदान केली आहे. त्यांनी इतिहास विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली असून " वारकरी संप्रदायात वंजारी समाजातील संतांचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास " हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. राजर्षी शाहू महाविद्यालय परभणी चे प्राचार्य डॉ. विठ्ठल घुले हे त्यांचे मार्गदर्शक होते. इतिहास विषयात प्राध्यापक पदासाठीची राज्य पात्रता परीक्षा (सेट) उत्तीर्ण झाले आहेत. मानवत येथील के.के.एम. महाविद्यालयाचे प्राचार्य कन्हेरवाडी चे भुमिपुत्र डॉ.भास्कर सोपानराव मुंडे यांचे युवराज हे सुपुत्र आहेत. या यशाबद्दल पुणे इन्कमटॅक्स आयुक्त मा. श्री. विश्वास सोपानराव मुंडे साहेब (IRS) , पुणे समाज कल्याण आयुक्त सौ.दीपाताई विश्वासराव मुंडे IAS, न्यायाधीश मा. श्री .आनंद सोपानराव मुंडे ,डॉ. कल्याण सोपानराव मुंडे , नारायण फड आदींनी या यशाबद्दल अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

या यशाबद्दल पाथरी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजयकुमार कत्रुवार, उपाध्यक्ष अनिलराव नखाते, सचिव बालकिशनभाऊ चांडक, कोषाध्यक्ष रामचंद्रराव कत्रुवार, सहसचिव विजयकुमारजी दलाल, संचालक दिलीपराव हिबारे,संजयजी लड्डा, संजयकुमार बांगड, जगदीशजी बांगड,डॉ. आनंदजी कत्रुवार, जयकुमारजी काला, आनंदरामजी मंत्री, ॲड. दिगंबरराव बारटक्के यांनी अभिनंदन केले आहे.